MHWS080005822023

**रे.दि.मु.क्रं. ४३/२०२३ मधील निशाणी क्र.२९ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादी तर्फे दि.प्र.सं. आदेश ०१ नियम १० सहकलम १५१ नुसार वादी क्र.०२ चे नाव कमी करण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीचे अर्जातील कथनानुसार, दावा वादीच्या पुराव्यावर नेमलेला असतांना वादी क्र.०२ इंदुबाई जगन बाजड या दिनांक २१.०६.२०२५ रोजी मयत झाल्या. त्यांचे कायदेशीर वारस याकामी पक्षकार म्हणून समाविष्ट असल्याने नविन वारस रेकॉर्डवर घेण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे मयत वादी क्र.०२ इंदुबाई यांचे नाव दाव्यातून कमी करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही प्रकारचे नुकसान होणार नसून दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. त्यामुळे अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली.

३. सदर अर्जावर प्रतिवादीतर्फे म्हणणे मागवण्यात आले असता अर्जास विरोध नोंदवून विलंबाने अर्ज दाखल केल्याचे नमूद केले.

४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन करता वादीने प्रस्तुतचा दावा वाटप, दरम्यानचे उत्पन्न व वादमिळकतीचे निम्म्या क्षेत्राचे उत्पन्नाबाबतचे विवरण मिळणेकरीता दाखल केलेला आहे. दाव्याचे कामी नि.क्र.१९ वर मुददे काढण्यात आलेले असून दावा वादीच्या पुराव्यावर प्रलंबीत आहे. दरम्यानचे काळात यातील वादी क्र.०२ इंदुबाई जगन बाजड या दिनांक २१.०६.२०२५ रोजी मयत झाल्या असून त्यांचे सर्व कायदेशीर वारस दाव्याचे कामी सामील असल्याचे नमूद करुन त्यांचे नाव कमी करण्यात यावे अशी विनंती केली आहे. वादी क्र.०२ चे मृत्यूबाबत व दाव्यात सामील वारसांबाबत प्रतिवादीतर्फे म्हणण्यात कोणताही आक्षेप नोंदवल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे

मयत वादी क्र.०२ चे नाव दाव्यातून कमी केल्यास सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सदरची दुरुस्ती तांत्रीक स्वरुपाची असल्याने मंजूर करणे आवश्यक ठरते. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत असल्याचे निष्कर्षाप्रत येउन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | वादीचा अर्ज नि.क्र.२९ मंजूर करण्यात येतो. |
| २. | वादींना अर्जात नमूद केल्याप्रमाणे वादी क्र.०२ चे नाव कमी करण्याबाबत मूळ दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येते तसेच वादींनी १४ दिवसाचे आत आवश्यक दुरुस्ती करुन तशी दावा दुरुस्तीप्रत दाखल करावी. |
| ३. | खर्चाबाबत कोणताही आदेश नाही. |

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

PRATAP VISHNU SAPKAL
Digitally signed by PRATAP VISHNU SAPKAL
Date: 2025.09.23 17:25:37 +0530

(पी.व्ही. सपकाळ)

दिनांक २३.०९.२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रिसोड

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | H. A. Uchade. |
| Name of court | : | C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : | 23.09.2025 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 23.09.2025 |
| Judgment/Order uploaded on | : | 23.09.2025 |